भारतीय प्रजासत्ताक दिन
चिरायू होवो..!

# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 165 ■ रविवार, दि. 26 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## गोरेगावमध्ये फर्निचर मार्केटमध्ये आग; आगीची तीव्रता आणखी वाढली

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : गोरेगाव पूर्व येथील खडकपाडा फर्निचर मार्केटमध्ये शनिवारी सकाळी ११.१५ च्या सुमारास भीषण आग लागली. लाकडी वस्तूचे समान ठेवलेल्या पाच ते सहा गाळ्यांना आग लागली असून आगीची तीव्रता वाढली आहे. तब्बल दोन हजार चौरस मीटर परिसरात ही आग पसरली आहे.

गोरेगाव पूर्वेकडे रहेजा इमारत परिसरात खडकपाडा येथील फर्निचर मार्केटमध्ये सकाळी अचानक मोठी आग लागली. आगीमुळे आसपासच्या परिसरात धुराचे लोट पसरले होते. घटनास्थळी अग्निशमन दलाचा ताफा आग विझवण्याचे काम करीत आहे. आठ फायर इंजिन, पाण्याचे पाच ट्रॅन्कर घटनास्थळी असून आगीची तीव्रता वाढल्याचे अग्निशमन दलाने जाहीर केले आहे. या आगीत लाकडी सामान, प्लास्टिक, थर्माकोल, प्लायवुड, भंगार सामान आदी मोठ्या प्रमाणावर जळून खाक झाले. अग्निशमन दलाने ११.१८ च्या सुमारास आगीसाठी श्रेणी १ ची वर्दी दिली होती. मात्र आगीची तीव्रता वाढताच ११.२४ वाजता आगीची श्रेणी क्रमांक २ ची वर्दी देण्यात आली. क्षणाक्षणाला आग अक्राळविक्राळ रुप धारण करीत होती. अग्निशमन दलाने अखेर ११.४८ च्या सुमारास श्रेणी ३ ची वर्दी दिली. अग्निशमन दलाचे जवान आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत.

## मनसेत गटबाजी उफाळली, राज ठाकरेंनी नाशिक दौरा अर्धवट सोडल्यानंतर मोठ्या घडामोडी, पक्षात भाकरी फिरणार?

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे गुरुवारी (दि. २३) नाशिक दौऱ्यावर आले होते. विधानसभा निवडणुकीच्या दारूण पराभवानंतर राज ठाकरे पहिल्यांदाच नाशिकमध्ये आले. आगामी महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मनसेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच पक्षातील अंतर्गत नाराजी, कुरघोडी, गटबाजी करर्णायांना राज ठाकरे यांनी समज दिली होती. राज ठाकरेंच्या दौऱ्यानंतर मनसेत फेरबदलाचे संकेत दिसून येत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून नाशिकमधील मनसेच्या बड्या नेत्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये मनसेत पुन्हा एकदा गटबाजी उफाळून आल्याचे पाहायला मिळत आहे. पक्षाजतील बंडाळी अधिक उफाळून येऊ नये यासाठी रा ठाकरेंनी नाशिकला धाव घेतली होती. गुरुवारी नाशिकमध्ये राज ठाकरेंनी पक्षातील निवडक पदाधिकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधत त्यांनी पक्षसंघटनेचा आढावा घेतला होता.

राज ठाकरे भाकरी फिरवणार?

पक्षातील अंतर्गत नाराजी, कुरघोडी, गटबाजी करणाऱ्यांना राज ठाकरे यांनी समज दिली होती. म नसेचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून शुक्रवारी राज ठाकरे मुंबईला रवाना झाले होते. राज ठाकरे हे तीन दिवस नाशिक दौऱ्यावर आले होते. मात्र ते एकाच दिवसात मुंबईला परतले. यानंतर नाशिकसह अनेक ठिकाणी मनसेच्या पक्ष संघटनेची पुनर्बांधणी करण्यासंदर्भात पक्षात हालचाली सुरु झाल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत फेरबदलाचे संकेत मिळत असून मनसेत भाकरी फिरवली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# पद्म पुरस्कार जाहीर : महाराष्ट्राला एकूण १४ पद्म पुरस्कार


### माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी व गजल गायक पंकज उधास यांना मरणोत्तर पद्मभूषण; ११ मान्यवरांना पद्मश्री जाहीर

नवी दिल्ली दि. २५: देशातील सर्वोच्च नागरी पद्म पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली. महाराष्ट्रातून माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी व गजल गायक पंकज उधास यांना मरणोत्तर तसेच ज्येष्ठ दिग्दर्शक शेखर कपूर यांना पद्म भूषण तर ११ मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाले आहेत.

केंद्रीय गृहमंत्रालयाच्यावतीने दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार म्हणून ओळखल्या जाणा-या पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात येते. गृह मंत्रालयाकडून आज या मानाच्या पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. सार्वजनिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी दिवंगत माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी व दिवंगत गजल गायक पंकज उधास आणि चित्रपट दिग्दर्शक शेखर कपूर यांना पद्म भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

११ मान्यवरांना यांना पद्मश्री जाहीर

कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी





महाराष्ट्रातील ६ मान्यवरांना पद्मश्री जाहीर झाले आहेत यात सुलेखनकार अच्युत पालव, मराठी चित्रपसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, शास्त्रीय गायक अश्विनी भिडे देशपांडे, पार्श्व गायिका जस्पिंदर नरुला, ज्येष्ठ बासरी वादक रानेद्र भानू मजुमदार, ज्येष्ठ चित्रकार वासुदेव कामत यांना जाहीर झाले आहेत.

व्यापार व उद्योग क्षेत्रात वेगळा ठसा उमटविणाऱ्या अरूंधती भट्टाचार्य यांना तर पर्यावरण आणि वनसंवर्धन करणारे चैत्राम पवार सामाजिक क्षेत्रातील कार्यासाठी पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील कार्यासाठी महाराष्ट्राचे अरण्य ऋषी वन्यजीव अभ्यासक मारोती चीतमपल्ली यांना, तर कृषी क्षेत्रात भरीव कामगिरीसाठी सुभाष शर्मा आणि वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम कार्यासाठी विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्कार आज जाहीर झाले आहेत.

या वर्षी एकूण १३९ पद्म पुरस्कार जाहीर झाले. यामध्ये ०७ पद्म विभूषण, १९ पद्म भूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कार सामील आहेत. यासह २३ महिला तर १० हे परदेशी नागरिक आहेत. १३ मान्यवरांना मरणोत्तर पद्म पुरस्कार जाहीर झाले आहेत.

## खोटं बोलून जाळ्यात फसवलं, नंतर केली बदनामी; यूपीतील जज तरुणीच्या तक्रारीनंतर महाराष्ट्रातील तरुणाला अटक

**नांदेड/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील एका भामट्यानं सोशल माध्यमावर यूपीच्या जज तरुणीला आपण जज असल्याची खोटी बतावणी करत तिच्याशी मैत्री केली. त्यानंतर लाल दिव्याची गाडी घेऊन जज तरुणीच्या घरी जात तिला लग्नाची मागणी घातली. मात्र, तरुणीनं लग्नाला नकार दिल्यानंतर त्यानं तिची सोशल माध्यमांवर बदनामी करण्यास सुरुवात केली. दरम्यान, या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर आता हिमांशू देवकते नामक तरुणाला अटक करण्यात आली आहे. नांदेडच्या देगलूर येथील हिमालय उर्फ हिमांशू देवकते या तरुणानं उत्तर प्रदेशातील एका जज तरुणीसोबत सोशल मीडियावर मैत्री केली. तसंच आपण जज असल्याची खोटी थाप त्यानं मारली. त्यानंतर लाल दिव्याची गाडी घेऊन तो थेट जज तरुणीच्या घरी पोहोचला आणि तिला लग्नाची मागणी घातली. परंतु, तरुणीनं लग्नास नकार दिला. त्यानंतर संतप्त तरुणानं जज तरुणीचे फोटो सोशल मीडियावर टाकत तिची बदनामी केली. तसंच वारंवार धमकी देऊन नंतर पन्नास लाख रुपयांची खंडणी मागितली. ''तू माझी पत्नी म्हणून महाराष्ट्रात नाही आली, तर आणखी बदनामी करून तुझं जीवन संपवेल,'' अशा धमक्या त्यानं दिल्या. अखेर जज तरुणीच्या तक्रारीवरुन १५ जानेवारीला आरोपी विरुद्ध मेरठ येथील सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तेव्हापासून तेथील पोलीस आरोपीचा शोध घेत होते. दरम्यान, मेरठ पोलिसांनी देगलूर पोलिसांच्या मदतीनं देगलूर तालुक्यातील तमलुर येथून हिमालय उर्फ हिमांशू मारुती देवकते या आरोपीला अटक केली.

## एसटी भाडेवाढीचे मंत्री भरत गोगावलेंकडून समर्थन, 'चांगली सुविधा, गाड्या पाहिजे तर...'

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रात सध्या एसटी भाडेवाढीचा विषय जोरात चर्चेत असून यावरुन राज्य सरकारवर टीका केली जात आहे. एसटी बसेसच्या प्रवासी भाडेदरात वाढ करण्यात आली आहे. हकिम समितीने निश्चित केलेल्या सूत्रानुसार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडलाने वाहतूक सेवांच्या भाडेदरात १४.९५ टक्के वाढ करण्यास मान्यता दिली आहे. २५ जानेवारीपासून म्हणजेच आजपासून राज्यभरात ही वाढ लागू झाली आहे. यावर प्रवाशांकडून संतप्त प्रतिक्रिया येत असताना मंत्री भरत गोगावले यांनी या भाडेवाढीचे समर्थन केले आहे.

एस टी भाडेवाढीचे मंत्री भरत गोगावले यांच्याकडून समर्थन करण्यात आले आहे. चांगली सुविधा, चांगल्या गाड्या आणि ड्रायव्हर कंडक्टर यांना पगारवाढीसाठी भाडेवाढ क्रमप्राप्त असल्याचे भरत गोगावले म्हणाले आहेत. एस टी प्रवास भाड्यात १५ टक्क्यांनी दरवाढ करण्यात आली असून या भाडेवाढीचे समर्थन रोजगार हमी योजना भरत गोगावले यांनी केलं आहे.

चांगली सुविधा, चांगल्या गाड्या आणि ड्रायव्हर कंडक्टर यांच्या पगार वाढ पाहिजे असेल तर भाडेवाढ क्रमप्राप्त असल्याचे गोगावले म्हणाले आहेत. एसटी महामंडळ दर महिन्याला ५० कोटी रुपये तोट्यात आहे. गेल्या तीन वर्षात भाडेवाढ झाली नसल्याचा मुद्दा देखील गोगावले यांनी उपस्थित केला आहे.

महामंडळाने प्रसिद्धीपत्रकात दिलेल्या माहितीनुसार, वाहनासाठी आवश्यक असलेल्या डिझेल, चेसीस, टायर या घटकांच्या किंमतीत बदल झाल्याने तसंच महागाई भत्त्यात वाढ झाल्याने आपोआप भाडेवाढ सुत्रानुसार उपाध्यक्ष आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी १ जानेवारी २०२५ रोजी परिवहन महामंडळाच्या बसेसच्या प्रवासी भाडेदरात वाढ करण्याचा प्रस्ताव सादर केला होता.

नवे दर कसे असतील?

एसटीमधून प्रवास करता प्रति टप्पा ६ किमीसाठी भाडं आकारलं जातं. साध्या बसचे सध्याचे भाडे ८.७० रुपये आहे, ते आता ११ रुपये असेल. जलद सेवा (साधारण) आणि रात्र सेवा (साधारण बस) याचंही भाडं सारखंच असेल. निम आरामसाठी ११.८५ रुपयांऐवजी १५ रुपये मोजावे लागतील. शिवशाही (एसी) बसंच भाडं १२.३५ वरुन १६ रुपये झालं आहे. तर शिवशाही स्लिपरसाठी (एसी) १७ रुपये मोजावे लागणार आहे. तसंच शिवनेरीचं (एसी) भाडं १८.५० ऐवजी २३ रुपये झालं आहे. तसंच शिवनेरी स्लिपरचं भाडं २८ रुपये आहे.

# मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या, शिंदे समितीला मुदतवाढ

### मनोज जरांगेंचे उपोषण सुरू, १० मागण्या कोणत्या?

दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : मराठा आरक्षणाच्या मागणीकरिता मनोज जरांगे पाटील यांच्याकडून पुन्हा एकदा आमरण उपोषणाला सुरूवात झाली असून शनिवारी पहिल्याच दिवशी उपोषणस्थळी आंतरवाली सराटीमध्ये मोठी गर्दी झाली होती. मराठा समाजाच्या १० म ागण्या आम्ही सरकारपुढे ठेवलेल्या आहेत. सरकारने अध्यादेश काढून त्वरीत त्याची अंमलबजवाणी करून मराठा समाजाचे दुःख हलके करावे, असे जरांगे म्हणाले. तसेच संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्याही बळी प्रकरणात आपल्याला न्याय देण्याच्या भूमिकेसाठी सरकारविरोधात लढायचे असल्याचे जरांगे यांनी सांगितले.

संतोष देशमुख हत्या प्रकरण आणि सोम नाथ सूर्यवंशी यांच्या न्यायासाठी मुंबईत आक्रोश मोर्चा होत असताना जालन्याच्या अंबडमधील आंतरवाली सराटीमध्ये विक्रमी आठव्यांदा आमरण उपोषणाला जरांगे यांनी सुरुवात केली. याआधी माझी तब्येत बिघडल्यावर लोक गर्दी करायचे पण यावेळी उपोषणाच्या पहिल्याच दिवशी मंडप गर्दीने फुलून गेला आहे. तुम्ही उपोषणाला बसला नाहीत तरी चालेल, फक्त मला आशीर्वाद द्या, असे जरांगे म्हणाले.



आरक्षणाच्या मागणीकरता २५ जानेवारीपासून उपोषण सुरू झाले आहे. सगेसोयरे कायदा अंमलबजावणीसाठी जवळपास एक वर्ष लागलं. एक वर्षापासून समाज रस्त्यावर आहे. आजही मराठे त्याच ताकदीने उभे आहेत. आमच्या त्रासाची जाण सरकारला नाही. सरसकट कुणबी प्रमाण द्या. सगे सोयरे कायद्याची अंमलबजावणी तातडीने लागू करा. कुणबी नोंदीच्या आधारावर त्यांना आरक्षण द्यावे, सगळ्या सगे सोयऱ्यांचा व्यवसाय एकच आहे त्यामुळे मागेपुढे न पाहता कुणबी दाखले दिले जावेत, न्यायमुर्ती संपत शिंदे समितीला तातडीने मुदतवाढ द्या, दाखल्यांसाठी विशेष कक्ष पुन्हा सुरु करा, आंदोलकरांवरील गुन्हे मागे घ्या, सातारा–औंध–मुंबई–हैद्राबाद गॅझेट लागू करा तसेच आत्महत्या केलेल्या बांधवांच्या कुटुंबाला निधी आणि शासकीय नोकरी द्या, अशा १० मागण्या जरांगे यांनी राज्य शासनाकडे केल्या.

राज्य सरकारने मराठ्यांशी बेईमानी आणि हद्दारी करू नये. आज जरी केवळ आंतरवालीत उपोषण सुरू झालेले असेल तरी सामूहिक आंदोलनाचे लोण आता राज्यात पसरेल. मुख्यमंत्री फडणवीस राज्यातील मराठ्यांशी गद्दारी करणार नाहीत, अशी अपेक्षा आहे, असे जरांगे म्हणाले.

सरकारशी बोलणं झालंय का?

मराठा बांधवांना माझी विनंती आहे की कुटुंबाने परवानगी दिली नसेल तर उपोषणाला बसू नका. मी एकटाच उपोषण करायला पुरेसा आहे. केवळ तुमचा आशीर्वाद आणि साथ मला द्या, असे आवाहन जरांगे यांनी केले. तसेच उपोषण सुरू करण्यापूर्वी सरकारशी कोणतेही बोलणे झाले नसल्याचे त्यांनी सांगितले.

# सर्वांग सुंदर, सर्वोत्तम भारत हाच महाराष्ट्राचा ध्यास - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



दैनिक आपला विदर्भ

**प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला दिल्या शुभेच्छा**

**मुंबई/प्रतिनिधी** :सर्वांग सुंदर, सर्वोत्तम भारत घडविणे हा महाराष्ट्राचा ध्यास आहे. त्यासाठी निर्धार करूया, असे आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला शुभेच्छा दिल्या आहेत.

मुख्यमंत्री संदेशात म्हणतात, 'महाराष्ट्र हे भारताचे 'पॉवर हाऊस' आहे. आगामी काळात 'डेटा सेंटर'चे 'कॅपिटल' होणार आहे. आपले एमएमआर क्षेत्र जागतिक 'ग्रोथ सेंटर' होणार आहे. जागतिक गुंतवणूकदार आणि उद्योग क्षेत्रासाठी महाराष्ट्र 'मॅग्नेट' आहे. या सगळ्या शक्तिस्थळांमुळे महाराष्ट्राचे भारतीय अर्थव्यवस्था शक्तिशाली करण्यात अनन्य साधारण योगदान राहणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र आता थांबणार नाही. शेती – सिंचन, शिक्षण, आरोग्य, उद्योग– ऊर्जा यांसह पायाभूत सुविधा क्षेत्रांत महाराष्ट्राने आतापर्यंत नेत्रदिपक कामगिरी केली आहे. सामाजिक न्यायाच्या बाबतीत ही महाराष्ट्राने अव्वल स्थान राखले आहे. पर्यावरण आणि वातावरणीय बदलात समतोल राखण्याचे भान– संवेदना जतन केली आहे. महाराष्ट्राचा हाच लौकीक आपल्याला वाढवायचा आहे. त्यासाठी एकजूट करायची आहे.आपले भारतीय प्रजासत्ताक आणखी बलशाली करायचे आहे. त्यासाठी सर्व भेद बाजूला ठेवून, परस्पर स्नेह, सौहार्द वाढवूया. सर्वश्रेष्ठ, सर्वांग सुंदर आणि सर्वोत्तम भारत घडविण्याचा संकल्प करूया. आपल्या पुर्वसुरींना दिलेला राष्ट्रप्रेमाचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार करूया असे आवाहन करून, मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी राज्यातील जनतेला प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.



# भुमराळा - किनगाव जट्टू मार्गाची पालकमंत्र्यासमोर मांडली व्यथा

## आमदार मनोज कायंदे ही होते उपस्थित

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

**महारचिकना :** सामाजिक कार्यकर्ते देवानंद सानप यांच निवेदन असो किंवा आंदोलनाचा इशारा याची प्रशासनाला दखल घ्यावीच लागते हा परीसरातील नागरीकांना अनुभव आहे आणि देवानंदजी सानप यांनी निवेदन दिले म्हणजे आमच्या रस्त्याचे काम मार्गी लागणार अशा आशा परीसरातील शेकडो नागरीकांना लागुन राहतात हे विशेष.

मदत पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री व सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोज कायदे यांनी दिले सानप यांना रस्त्याचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

सिंदखेडराजा मतदार संघातील शेवटच्या टोकावर असलेल्या व लोणार तालुक्यातील भुमराळा ते किनगाव जटटू या मुख्य भागातील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे गेल्या तीन वर्षांपासून भुमराळा किनगाव जटटू मार्गावर खड्ड्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे त्यामुळे ग्रामस्थांच्या नशिबी अजूनही भोग सुरुच आहे या मार्गावर ये जा करणारे वाहन चालक,शेतकरी, विद्यार्थी, अक्षरशा त्रस्त झाले आहे आज घडीला हा मार्ग विद्यार्थ्यांसाठी व वाहनधारकांसाठी जीवघेणा ठरत आहे भुमराळा येथुन हा मार्ग मुख्य मार्ग व जागतिक लोणार सरोवर ते संभाजीनगर मार्गाला जोडल्या गेला असुन या मार्गाने गावकरी, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थांची मोठी वर्दळ असते परंतु मार्गावर जागोजागी मोठ मोठे खड्डे




पडले असून गिट्टी उघडली असल्याने मार्गाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे रात्री खड्डे चुकवण्याच्या नादात वाहनधारकांचे अनेक अपघात होतात पावसाळ्यात तर जिवघेणी कसरत करावी लागते व अशा आशयाचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद सानप यांनी जिल्ह्यचे पालकमंत्री ना.मंकरद पाटील यांना सिंदखेडराजा येथे भेटुन दिले भुमराळा किनगाव जट्टु परीसरातील शेकडो नागरिक उपस्थित होते

निवेदन देतेवेळेच राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तसेच बुलढाणा पालकमंत्री मा.ना.श्री. मकरंद जाधव पाटील तथा मतदार संघाची जाणीव असलेले आमदार श्री. मनोज भाऊ कायंदे यांच्या उपस्थितीत भुमराळा ते किनगाव जटटू रस्त्याच्या कामा संदर्भात स्वतः भेट घेऊन रस्त्यांची परिस्थिती समजावून सांगत निवेदन दिले निवेदन दिल्यानंतर पालकमंत्री व आमदार महोदय यांनी शब्द दिला की लवकरच डांबरीकरण कामाला सुरुवात करु असे आश्र्वासन पालकमंत्री यांनी दिले

## देश बलशाली होईल!

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे आपले दोन राष्ट्रीय सण आहेत. हे दोन्ही सण संपूर्ण भारतात मोठया उत्साहात साजरे केले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण या दिवशी तिरंग्यांला मानवंदना देऊन देशाप्रती कृतज्ञता व्यक्त करीत असतात ; पण दुर्दैवाने अनेक लोकांना स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन यातील फरक सांगता येत नाही. भारताला ब्रिटिश राजवटीपासून १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपल्या देशाला स्वतःचे संविधान नव्हते भारताचे कायदे हे भारतीय राज्य शासनाच्या १९३५ सालच्या कायद्यावर ( कलमावर ) आधारित होते. स्वतंत्र देशाला स्वतःचे संविधान असावे. त्या संविधानात देशाचा कारभार कसा चालवायचा या संबंधी नियम आणि कायदे असावेत तसेच नागरिकांचे हक्क आणि कर्तव्याचा देखील त्यात समावेश असावा असे सर्वांचे मत होते. हे संविधान तयार करण्याचे शिवधनुष्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या विद्वानाने पेलावे असे असे आव्हान करण्यात आले. तेंव्हा ते संविधान तयार करण्याचे आव्हान डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र भारताचे संविधान तयार करण्यासाठी मसुदा समिती स्थापन करण्यात समिती नेमण्यात आली. या समितीने संविधानाचा मसुदा तयार करून तो सभेपुढे ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर केला. या सभेने सार्वजनिक चर्चेसाठी सभागृहात हा प्रस्ताव १६६ दिवस खुला केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या नेतृत्वाखालील या समितीने दोन वर्ष अकरा महिने अठरा दिवसात संविधानाचा मसुदा तयार केला. बरेचसे विमर्श आणि सुधारणा केल्यानंतर २४ जानेवारी १९५० रोजी विधानसभेच्या ३०८ सदस्यांनी हा मसुदा मान्य केला. संविधानाच्या दोन हस्तलिखित प्रति तयार करण्यात आल्या. इंग्रजी व हिंदी भाषेत या प्रति होत्या. दोन दिवसांनी म्हणजे २६ जानेवारी १९५० पासून या संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली आणि भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले. संविधानेने आपल्याला मूलभूत हक्कांसोबत मूलभूत कर्तव्ये देखील दिली आहेत. हक्क आणि कर्तव्ये एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपण जितके हक्कांबाबत जागरूक असतो तितके आपण आपल्या कर्तव्याबाबत जागरूक नसतो. जर प्रत्येक नागरिकाने आपल्या संवैधानिक हक्कांसोबत संवैधानिक कर्तव्ये देखील प्रामाणिकपणे बजावली तरच भारत बलशाली होईल.

## सैफ अली खान हल्ला प्रकरणी मोठा ट्विस्ट, अटकेत असलेला तो आरोपी नाहीच, रिपोर्ट समोर

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता सैफ अली खान हल्ला प्रकरणात महत्त्वाची अपडेट येते आहे. सैफच्या घरात एक नाही तर दोन आरोपी होते, अशी शक्यता व्यक्त केली जाते आहे. सैफच्या घरात घुसणारा आरोपी मोहम्म शरीफुल इस्लाम शहजाद एकटाच नसून त्याचा आणखी एक साथीदार असल्याचा संशय पोलिसांना आहे. या अनुषंगाने पोलिसांकडून पुढील तपास सुरु असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी सैफ अली खानच्या घरातून जवळपास २०० हून अधिक फिंगरप्रिंट्स घेतले होते. ते फिंगरप्रिंट्स शरीफुलच्या फिंगरप्रिन्टशी मॅच होत आहेत की नाही याबाबत पोलिसांकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळेच हे फिंगरप्रिन्ट शरीफुलशी मॅच होत नसल्याचं म्हटलं जात आहे. त्यामुळे सैफ प्रकरणात जो आरोपी पकडला गेला आहे. तो तो आरोपी नाहीच, तो एकटा नव्हता, त्याचा आणखी एक साथीदारही त्याच्यासोबत होता असा पोलिसांना संशय आहे.

पोलिसांनी २४ जानेवारीला आरोपी शरीफुल इस्लामला कोर्टात हजर केलं असता, पोलिसांनी कोर्टाला सांगितलं की शरीफुल भारतात एकटा आला नाही. बांगलादेशातून त्याचे आणखी काही साथीदारही त्याच्यासोबत आल्याचा संशय आहे. या संपूर्ण प्रकरणाचा अधिक तपास करण्यासाठी पोलिसांनी कोर्टाकडून आरोपी शरीफुलची पोलीस कोठडी २९ जानेवारीपर्यंत वाढवून घेतली आहे.

**तो आमचा मुलगा नव्हेच**

तसंच शरीफुलला पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर त्याचे आई-वडील समोर आले. त्यांनी मीडियासमोर प्रतिक्रिया दिली. सीसीटीव्हीमध्ये दिसणारा व्यक्ती हा शरीफुल नाही. तो आमचा मुलगा नाही, दोघांचे चेहरे मॅच होत नाहीत, असा दावा त्यांनी केला होता.

**रक्ताच्या नमुन्याची तपासणी**

मुंबई पोलिसांनी तपासासाठी सैफ अली खानचे रक्ताचे नमुने आणि कपडे गोळा केले आहेत. हल्ल्याच्या वेळी सैफ अली खानने घातलेले कपडे चौकशीसाठी पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितलं आहे. याशिवाय, घटनेच्या रात्री आरोपी शरीफुल इस्लामने घातलेल्या कपड्यांवर रक्ताचे डाग आढळले आहेत. सैफ आणि शरीफुलच्या कपड्यांवरील रक्ताचे नमुने तपासण्यासाठी सैफ अली खानचेही रक्ताचे नमुनेही गोळा करण्यात आले आहेत.

## 'या' मोठ्या बँकांना आरबीआयचा दणका! ठोठावला कोट्यवधी रुपयांचा दंड

नवी दिल्ली : देशातील आर्थिक डबघाईला आलेल्या बँकांसह नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बँकांवर आरबीआय नेहमीच महत्त्वाची पाऊले उचलत असते. त्याचप्रमाणे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने देशातील तीन मोठ्या बँकांनी निर्देशांचे पालन न केल्याबाबत चांगलाच दणका दिला आहे. यामध्ये सहकारी बँकांचाही समावेश आहे.

आरबीआयने जम्मू आणि काश्मीर बँक, बँक ऑफ इंडिया आणि कॅनरा बँकेला नियम न पाळल्याबद्दल दंड ठोठावला आहे. यामध्ये निर्देशांचे पालन न केल्याबद्दल सार्वजनिक क्षेत्रातील बँक ऑफ इंडियाला १ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. तर कॅनरा बँकेवर १.६३ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. तसेच, नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी द्वारे वित्तीय सेवांच्या आउटसोर्सिंगमधील आचारसंहितेचे पालन न केल्याबद्दल डॅटसन एक्सपोर्ट्स पश्चिम बंगालला १ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

## पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कार जाहीर झालेल्यांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून अभिनंदन

### मनोहर जोशी (मरणोत्तर), पंकज उधास (मरणोत्तर) आणि शेखर कपूर यांना 'पद्मभूषण' मिळाल्याबद्दल उपमुख्यमंत्र्यांकडून आनंद व्यक्त

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने जाहीर केलेल्या पद्मपुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातून माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी (मरणोत्तर), गायक पंकज उधास (मरणोत्तर), निर्देशक-अभिनेते शेखर कपूर यांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला आहे. अभिनेते अशोक सराफ, गायिका आश्रि्वनी भिडे देशपांडे, निसर्गअभ्यासक मारुती चितमपल्ली, वनसंवर्धक चैत्राम पवार, होमिओपॅथी डॉ. विलास डांगरे, गायिका जसपिंदर नरुला, बासरीवादक रणेंद्र (रोणु) मजुमदार, चित्रकार वासुदेव कामत, सुलेखनकार अच्युत पालव, बँकर अरुंधती भट्टाचार्य तसेच कृषी क्षेत्रातील कामगिरीबद्दल सुभाष खेतुलाल शर्मा यांनाही पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या अभिनंदनपर संदेशात म्हणतात की, पद्मभूषण पुरस्कारांसाठी माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी (मरणोत्तर), गायक पंकज उधास (मरणोत्तर), निर्देशक-अभिनेते शेखर कपूर यांची झालेली निवड म्हणजे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचा, कलासमृद्धीचा गौरव आहे. ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांचा महाराष्ट्रभूषण पुरस्काराने गौरव झाल्यानंतर, त्यांना आता पद्मश्री जाहीर झाला आहे. त्यांना तसेच आश्रि्वनी भिडे देशपांडे, रणेंद्र मजुमदार, वासुदेव कामत, अच्युत पालव यांनी महाराष्ट्राचं, देशाचं कलाक्षेत्र समृद्ध केलं, त्यांना जाहीर झालेला पुरस्कार महाराष्ट्राच्या कलाक्षेत्राचा गौरव आहे. हा गौरव भावी पिढीच्या मनात कलाक्षेत्राबद्दल प्रेम, आस्था निर्माण करेल, असा विश्र्वास आहे.

वनं, पर्यावरण आणि निसर्गाशी घट्ट नाळ जुळलेल्या अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांना मिळालेला पद्मश्री पुरस्कार हा राज्यातल्या प्रत्येक निसर्गप्रेमीचा गौरव आहे. जंगल वाचणारा माणूस ही ओळख असलेल्या मारुती चितमपल्ली यांनी इतरांनाही जंगल वाचायला शिकवलं. त्याबाबतची गोडी निर्माण केली. त्यातून वनांच्या संरक्षणाबाबतची जागृती वाढली, हे त्यांचं मोठं यश आहे, असं मी मानतो.

चैत्राम पवार यांनी वनक्षेत्राच्या वाढीसाठी केलेलं काम गौरवास्पदंच आहे. छोट्यामोठ्या तळ्यांच्या उभारणीतून भूजल पातळी वाढवणे. वृक्षारोपणाचा कार्यक्रम यशस्वी करणे. जंगल, पशु, पक्षी यांच्या संरक्षण, संवर्धनाची सक्रीय चळवळ उभारण्याच्या त्यांच्या कार्याचा, पद्मश्री पुरस्काराने झालेला गौरव निसर्गाबद्दल आवड असलेल्या युवापिढीला प्रेरणा देणारा आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चैत्राम पवार यांचे अभिनंदन केले आहे.

होमिओपॅथी डॉक्टर विलास डांगरे यांना जाहीर झालेला पद्मश्री पुरस्कार हा, अर्ध्या शतकाहून अधिक काळ विदर्भातील गरीबांची वैद्यकीय सेवा करणाऱ्या समर्पित वृत्तीचा गौरव आहे. विदर्भातील वैद्यकीय सेवेतील भीष्मपितामह असा गौरव असलेल्या डॉ. विलास डांगरे यांनी ध्येयनिष्ठेने, समर्पित वृत्तीने पन्नास वर्षांहून अधिक गरीब रुग्णांची सेवा केली. याकाळात डॉक्टरांच्या अनेक पिढ्या त्यांनी घडवल्या. त्यांना मिळालेला पद्मश्री पुरस्कार हा समर्पित सेवाकार्याचा गौरव आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून पद्म पुरस्कारार्थींचे अभिनंदन

### पद्म भूषण पुरस्काराच्या औचित्याने माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी, प्रख्यात गायक पंकज उधास यांना अभिवादन



**मुंबई/प्रतिनिधी :** भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व पद्म पुरस्कारार्थींचे अभिनंदन केले आहे.

यात माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी, गायक पंकज उधास यांना मरणोत्तर पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या दोहोंचा त्यांच्या क्षेत्रातील कार्याचा बहुमान झाल्याची प्रतिक्रिया व्यक्त करून, त्यांना विनम्र अभिवादन केले आहे.

सुलेखनकार अच्युत पालव, एसबीआयच्या माजी अध्यक्ष श्रीमती अरुंधती भट्टाचार्य, ज्येष्ठ अभिनेते आणि महाराष्ट्रभूषण अशोक सराफ, ज्येष्ठ गायिका अश्रि्वनी भिडे- देशपांडे, बारीपाड्याचे वनसंरक्षक चैतराम पवार, ज्येष्ठ गायिका जसपींदर नरूला, अरण्यऋषी मारुती चितमपल्ली, ज्येष्ठ बासरीवादक रोणू तथा राणेंद्र भानू मजुमदार, कृषीतज्ज्ञ सुभाष शर्मा, चित्रकार वासुदेव कामत, ज्येष्ठ होमिओपॅथी तज्ञ डॉ विलास डांगरे या सर्वांना पद्म पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला आहे. या सर्वांनी आपापल्या कर्तृत्वाने, त्या त्या क्षेत्राचा गौरव वृध्दिंगत केला आहे. या सर्व मान्यवरांनी व्रतस्थ राहून कार्य केले आहे. यामुळे या क्षेत्रांच्या लौकिकात भर घातली गेली आहे. ही बाब प्रेरणादायी असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस या सर्वांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे.

अरण्यऋषी श्री. चितमपल्ली आणि डॉ. विलास डांगरे यांची कर्मभूमी नागपूर आणि विशेषत: विदर्भ परिसर राहिली आहे. या दोहोंचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद्म पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन केले आहे.

## राजमाता जिजाऊ माँ साहेबांना पालकमंत्री मकरंद पाटील यांचे अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राजमाता जिजाऊ यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील जिजाऊ माँ साहेबांच्या जन्मस्थळी आज राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री मकरंद पाटील यांनी दर्शन घेवून अभिवादन केले.

जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावर नियुक्ती झाल्यानंतर मंत्री मकरंद पाटील यांनी जिल्ह्यात दाखल होताच पहिल्यांदा राजमाता जिजाऊ यांच्या जन्मस्थळी भेट देवून दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी सिंदखेडराजा येथील जिजाऊ सृष्टीस भेट देवून अभिवादनही केले. यावेळी त्यांच्यासमवेत आमदार






मनोज कायंदे, माजी खासदार सुखदेव काळे, माजी आमदार तोताराम कायंदे, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, तहसीलदार अजित दिवटे, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

महत्त्वाचे...

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घेतले अंबाबाई देवीचे दर्शन





दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी यांनी कोल्हापूर दौऱ्यावर आल्यावर अंबाबाई देवी आणि मातृलिंग मंदिरात दर्शन घेतले. विधानसभा निवडणुकीवेळी महायुतीला यश आल्यानंतर पुन्हा दर्शनाला येण्याचे ठरवले होते. तर निवडणुकीत अंबाबाईच्या आशीर्वादाने कोल्हापुरातच नाही तर महाराष्ट्रात महायुतीला दैदिप्यमान यश मिळाले आहे. त्यामुळेच आता देवीच्या दर्शनासाठी आल्याचे शिंदे यांनी बोलताना सांगितले.

## जिल्ह्याच्या विकासासाठी पालकमंत्री या नात्याने आता कठोर निर्णय घेणार- मेघना बोर्डीकर

दैनिक आपला विदर्भ



**परभणी/प्रतिनिधी :**भाजप नेतृत्वाने मला परभणी जिल्ह्याच्या पालकत्वाची जबाबदारी दिली आहे. राज्यात आणि केंद्रात भारतीय जनता पक्षाचे सरकार आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी काही कठोर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे आणि ते कठोर निर्णय मी घेणार आहे. या निर्णयांमध्ये महायुतीचे आमदार म्हणून आपण मला साथ द्यावी. याशिवाय परभणी जिल्ह्याचा विकास होणार नाही असे म्हणत पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी महायुतीच्या जिल्ह्यातील आमदारांना साथ देण्याचे आवाहन केले आहे. परभणीच्या पोखरणी नरसिंह येथे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचा भव्य असा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता यावेळेस त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्कार सोहळ्याला पाथरी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार राजेश विटेकर गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रीय समाज पक्षाचे आमदार डॉक्टर रत्नाकर गुट्टे हे देखील उपस्थित होते.

## जळगाव-छत्रपती संभाजीनगर मार्गावर नागरिकांनी केला रस्ता रोको





दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** सावंगी परिसरातील न्यू बिगिनिंग इंटरनॅशनल स्कूल येथे एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची घटना घडली होती. यातील आरोपीला पोस्को अंतर्गत अटक करण्यात आली आहे. मात्र यात आरोपी सय्यद या एकालाच अटक केली आहे परंतु इतर दोन आरोपींना अद्याप अटक केली नाही, याकरिता तेथील नागरिकांनी आज नायगाव फाटा ते न्यू बिगिनिंग इंटरनॅशनल स्कूल पर्यंत निषेध मोर्चा काढून रस्ता रोको केला आहे. शाळेच्या गेटवर धरणे आंदोलन करुन दोन्ही आरोपींना अटक करण्याची मागणी नागरिकांनीकेली आहे.

## माथेरानच्या गारव्यात अग्नितांडव!

**रायगड/प्रतिनिधी :** माथेरान मधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण असणाऱ्या माथेरान घाटात आज बर्निंग कारचा थरार पाहायला मिळाला. लागोपाठ आलेल्या सुट्ट्यांमुळे माथेरानला पर्यटकांची मंदियाळी पाहायला मिळते आहे. माथेरान फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांच्या वाहनाला घाट चढत असताना अचानक आग लागली. या आगीत कार चालक आणि त्याची प्रेयसी अडकली होती. प्रसंगावधान राखत जीव मुठीत घेऊन दोघांनीही आपला जीव वाचवण्यासाठी गाडीतून उडी मारली. घटनास्थळी नेरळ पोलीस हजर झाले होते. तर दोन्ही बाजूकडील वाहतूक रोखण्यात आल्याने घाटात पर्यटकांच्या वाहनांची लांबच लांब रांग लागली होती.

# प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरा

## टीचर्स फ्रंट चे उच्च शिक्षण संचालकांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची महाविद्यालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात यावी , अशा आशयाचे निवेदन आज उच्च शिक्षण संचालक डॉ शैलेंद्र देवळाणकर यांना टीचर्स डेमोक्रॅटिक फ्रंट च्या वतीने देण्यात आले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अनुषंगाने वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची शंभर टक्के पदे भरल्या गेल्या पाहिजेत,अशी तरतूद आहे. परंतु प्रत्यक्षात महाराष्ट्रातील महाविद्यालयात शिक्षक संवर्गाची ५४% पदे रिक्त आहेत. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलात आणण्याच्या दृष्टिकोनातून अनेक अडचणी संस्थाचालक व प्राचार्यांसमोर निर्माण होत आहेत. अध्यापन व कार्यालयीन कामकाज सुरळीत होण्याच्या दृष्टिकोनातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पूर्ण पदे भरण्यात आल्यात , तर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अमलात आणण्यास सहकार्य लाभेल, आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या प्रगत होईल, अशी अपेक्षा टीचर्स डेमोक्रॅटिक फ्रंट च्या वतीने डॉ.प्रशांत विघे यांनी दिलेल्या निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

**शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती प्रमाणेच**

१९ सप्टेंबर १९९१ ते १४ जून २००६ या काळात झालेल्या नियुक्तीच्या दरम्यान ११ जुलै २००९ पर्यंत ज्यांनी एम.फिल ही शैक्षणिक पात्रता पूर्ण करण्यात आलेली आहे. त्या आधारावर वेळोवेळी मागण्यात आलेले प्रस्ताव त्वरित संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे कार्यालयाने युजीसी कार्यालयासोबत पाठपुरावा करून त्वरित निकाली काढावे, समाजकार्य महाविद्यालयातील स्थान निश्र्चिती पूर्ण करून सह-संचालक कार्यालयातून आर्थिक स्वरूपाची कार्यवाही लवकरात लवकर मार्च २०२५ पासून सुरू करावी. सोबतच समाजकार्य महाविद्यालयामध्ये २००५ पूर्वी शासनाच्या निर्देशाप्रमाणे विनाअनुदानित तत्वावर लागलेल्या शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती करत असताना २०१७ पर्यंत रिक्त झालेल्या जागावर पदनिश्र्चिती न करता डिसेंबर२०२४ पर्यंत रिक्त झालेल्या पदावर पदनिश्चिती करावी. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती विद्यापीठ पत्र क्रमांक/८/सी-८८/२०२५,



दि.१३/०१/२०२५ या पत्राद्वारे जागा भरतीच्या संदर्भामध्ये दिलेली स्थगिती तात्काळ उठवण्यात यावी. अश्या मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

# 'पद्मभूषण', 'पद्मश्री' पुरस्कारामुळे महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा

## महाराष्ट्रातील पुरस्कारार्थींचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून अभिनंदन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारने जाहीर केलेल्या पद्म पुरस्कारांमध्ये महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि प्रसिद्ध गायक पंकज उधास यांना मरणोत्तर तर अभिनेते शेखर कपूर या तिघांना 'पद्मभूषण' पुरस्कार जाहीर झाला आहे. तर 'महाराष्ट्र भूषण' ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, सुलेखनकार अच्युत पालव, नागपूरचे होमिओपॅथी चिकित्सक डॉ. विलास डांगरे, अरुण्यऋषी मारुती चितमपल्ली, वन, वन्यजीव संवर्धनामध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेले चैत्राम पवार यांच्यासह अकरा मान्यवरांना 'पद्मश्री' पुरस्कार जाहीर झाल्याने महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवल्याची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे. उपमुख्यमंत्र्यांनी या पुरस्कारार्थींचे अभिनंदन केले आहे.



उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी म्हटले आहे की, केंद्र शासनाने जाहीर केलेल्या पद्म पुरस्कारामध्ये महाराष्ट्रातील समाजकारण, कला, साहित्य, चित्रकला, वैद्यकीय, वनसंवर्धन, कृषी, उद्योग आदी क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा समावेश आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा सुसंस्कृत चेहरा असलेले राज्याचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना मरणोत्तर पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. जोशी सरांना अभिवादन करतानाच ज्येष्ठ गायक पंकज उधास यांनाही हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिवादन करीत असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी म्हटले आहे. ज्येष्ठ अभिनेते महाराष्ट्र भुषण अशोक सराफ यांनी आपल्या अभिनयाने चित्रपट, नाट्य रसिकांना मंत्रमुग्ध करीत त्यांच्यावर अधिराज्य गाजवले आहे. अच्युत पालव यांनी आपल्या ४० वर्षाच्या कारकीर्दीत सुलेखन क्षेत्रात नाव कमवले आहे. नागपुरचे ७० वर्षीय होमिओपॅथिक डॉक्टर विलास डांगरे यांनी ५० वर्षांहून अधिक काळ आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना नाममात्र शुल्कात उपचार केले आहेत. विदर्भात त्यांची ओळख वैद्यकीय सेवेतील भीष्म पितामह अशी आहे. प्रतिभावंत लेखक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पक्षिशास्त्रज्ञ व वन्यजीव अभ्यासक, अवघे जीवन वनविद्येचा अभ्यास आणि लेखनासाठी समर्पित करणारे व्यासंगी संशोधक व वनाधिकारी अशी अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांची ओळख संपूर्ण देशाला आहे. चैत्राम पवार यांनी वन, वानिकी तसेच वन्यजीव संवर्धनामध्ये उल्लेखनीय कामगिरी दखल घेऊन त्यांना यंदाच्या पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाचा पहिलाच वनभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

तर चित्रकार वासुदेव कामत, गायिका अश्विनी भिडे-देशपांडे, जसपिंदर नरूला, रानेंद्र मुजुमदार, अरुंधती भट्टाचार्य, सुभाष शर्मा यांनी देखील आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पातळीवर झळकल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

## हिंजवडीच्या भीषण अपघाताचा व्हिडीओ समोर, भरधाव डंपर आडवा होऊन स्कुटीवर पडला, पोरींना सावरायला संधीच मिळाली नाही

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात गेल्या काही दिवसांमध्ये अपघाताच्या अनेक घटना घडत असल्याचं चित्र आहेत. बेशिस्तपणे वाहन चालवणे, वाहन चालवताना मोबाईलचा वापर करणे, अतिवेगात वाहने चालवणे अशा एक ना अनेक कारणामुळे अनेक निष्पाप जिवांचे बळी जातात. अशातच हिंजवडीत झालेल्या एका घटनेमध्ये दोन विद्यार्थीनींचा हकनाक बळी गेल्याची घटना घडली आहे. हिंजवडीमध्ये भरधाव वेगात निघालेला रेडिमिक्स डंपर वळणावर आला आणि वाहनावरील चालकाचं नियंत्रण सुटलं. यामुळं रेडिमिक्स डंपर पलटी झाला, पण दुर्दैवाने डंपरखाली शेजारून जात असलेली दुचाकी दबली गेली, दुचाकीवरील दोन विद्यार्थिनींचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

## सैफ हल्ला प्रकरणात मोठी अपडेट! नवाबच्या घरातील फिंगरप्रिन्ट्स शरीफुलशी मिसमॅच?

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता सैफ खान हल्ला प्रकरणात मोठा ट्विस्ट समोर आला आहे. हल्ल्याप्रकरणात आरोपी म्हणून शरीफुल याला ताब्यात घेण्यात आलं. मी सैफवर हल्ला केला नसल्याचं त्याने कोर्टात सांगितलं. दरम्यान दुसरीकडे पोलिसांनी सैफ अली खानच्या घरातून हल्लेखोराचे फिंगरप्रिन्ट्स घेतले होते. पण ते फिंगर प्रिंट पोलिसांच्या ताब्यात असलेल्या शरीफुल याच्या फिंगर प्रिंटशी मॅच होत नसल्याची धक्कादायक माहिती सूत्रांच्या हवाल्याने समोर येत आहे. शरीफुलबरोबर आणखी एक आरोपी असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. शरीफुलबरोबर असलेल्या इतर आरोपीचा तपास मुंबई पोलीस करत आहे.

मुंबई पोलिसांनी सैफ अली खानच्या घरातून जवळपास २०० हून अधिक फिंगर प्रिन्ट गोळ्या केल्या होत्या. त्या फिंगर प्रिन्ट्स शरीफुलच्या फिंगरप्रिन्टशी मॅच होत आहेत की नाही याबाबत पोलिसांकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळेच या फिंगरप्रिन्ट शरीफुलशी मॅच होत नसल्याचं म्हटलं जात आहे.

शरीफुलला पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर त्याचे आई-वडील समोर आले होते ज्यांनी असा दावा केला की सीसीटीव्हीमध्ये दिसणारा व्यक्ती हा शरीफुल नाही. दोघांचे चेहरे मॅच होत नाहीत.

त्याचप्रमाणे एका तपास अधिकाऱ्याने सांगितलेल्या माहितीनुसार, सैफ अली खान आणि हल्लेखोराच्या रक्ताचे नमुने आणि कपडे फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी (इएथ) मध्ये तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. यावरून हल्लेखोराच्या कपड्यांवर असणारे रक्ताचे डाग सैफ अली खानच्या रक्ताचे आहेत की नाहीत, हे सिद्ध होईल.

# इकडे पोलिसांचे दोन मोठे निर्णय, तिकडे धनुभाऊंनी जगमित्र कार्यालयात बैठक बोलावली, बीडमध्ये घडामोडींना वेग

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणाचा तपास सुरु असताना पोलीस दलाकडून दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. परळीतील महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाचा तपास आता परळी पोलिसांकडून काढून घेण्यात आला आहे. हा तपास आता पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याकडे देण्यात आला आहे. तसेच संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या तपासासाठी नेमण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने वाल्मिक कराड याची मालमत्ता जप्त करण्यासाठी हालचाली सुरु केल्या आहेत. एसआयटीने बीड विशेष न्यायालयात संपत्ती जप्त करण्याच्या परवानगीसाठी अर्ज दाखल केला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी परळीतील जगमित्र कार्यालयात एक बैठक बोलावली आहे. पोलिसांकडून करण्यात आलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना यासंदर्भात मेसेज पाठवण्यात आले आहेत. धनंजय मुंडे विविध विषयांवर मार्गदर्शन करणार असून सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे ही विनंती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी,विविध आघाडीचे पदाधिकारी यांना सूचित करण्यात येते की, उद्या शनिवार दिनांक २५ जानेवारी रोजी सायंकाळी ५:०० वाजता राज्याचे अन्न नागरी व





ग्राहक संरक्षण मंत्री ना.धनंजय मुंडे साहेब यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली 'जगमित्र कार्यालय' येथे महत्वपूर्ण बैठक आयोजित केली असून आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे, असा मजकूर या मेसेजमध्ये नमूद करण्यात आला आहे.

**बैठकीतील महत्वपूर्ण विषय**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक, आरोग्य सहाय्यता कक्ष स्थापना, मकर संक्रांत निमित्त महिलांसाठी कार्यक्रम, त्यागमूर्ती माता रमाई जयंती, शिवजयंती, महाशिवरात्री यात्रा महोत्सव

**वाल्मिक कराडची सिटी स्कॅन तपासणी**

गेल्या काही दिवसांपासून पोलीस कोठडीत राहिल्यामुळे वाल्मिक कराड याची प्रकृती बिघडल्याची माहिती समोर आली होती. नुकतेच त्याच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले होते. त्यानंतर आता वाल्मिक कराड याची सिटी स्कॅन तपासणी करण्यात आली आहे. त्याचा अहवाल डॉक्टरांना पाठवण्यात आला आहे. वाल्मिक कराड याच्यावर पोटदुखीचे उपचार सुरु आहेत. तपासणी करणाऱ्या डॉक्टरच्या सल्ल्यानुसार उपचाराची पुढील दिशा ठरणार आहे, अशी माहिती प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर एस.बी.राऊत यांनी दिली.

**धनंजय मुंडे सत्तेत असताना वाल्मिक कराडची चौकशी कशी होणार? आव्हाडांचा सवाल**

मुंबईतील जनआक्रोश मोर्चात शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी धनंजय मुंडे यांना लक्ष्य केले. धनंजय मुंडे यांना सत्तेत ठेऊन तुम्ही कराडची चौकशी करत आहात. असं कसं चालेल? मला कळत नाही की वाल्मिक कराडला सगळे का घाबरतात? त्याच्याकडे काही कुणाचे व्हिडिओ आहेत का? त्यामुळेच त्याला सगळे घाबरतात का?, असा सवाल धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला. वाल्मिक कराड हा सध्या रुग्णालयात आरामात झोपला आहे. आता त्याला मोठे आजार होतील आणि तो मस्त आराम करेल. माझ सांगणं आहे की सोडूनच द्या ना त्याला, अशी खोचक टीकाही जितेंद्र आव्हाड यांनी केली.

# डंपर-ट्रॅक्टरच्या भीषण अपघातात तरुण ठार; तीन जण जखमी

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव शहरातील दूध फेडरेशन जवळील भाग्यश्री पेट्रोल पंपाजवळ विटा घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरला डंपरने भरधाव दिलेल्या धडकेत अंकुश आत्माराम भिल हा तरुण जागीच ठार झाला तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. ट्रॅक्टर विटा घेऊन जात असताना मागून येत ओव्हरटेक करत





असताना डंपरने ट्रॅक्टरला कट मारला आणि ट्रॅक्टर पलटी झाले. त्यामुळे ट्रॅक्टरवर बसलेला अंकुश भील हा ट्रॅक्टर खाली दाबला गेल्याने त्याचा जागेवरच मृत्यू झाला. तर त्याच्यासोबत असलेले सुनील भिल, गणेश भिल आणि शुभम भिल असे तीन जण गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, अपघाताची घटना एका सीसीटीव्हीत कैद झाली असून त्यात सुदैवाने काही विद्यार्थी बचावल्याचे दिसत आहे.

विविध वृत्त...

## त्रिशूल स्वसंरक्षणासाठी देण्यात आला आहे, त्यात काहीही चुकीचे नाही; यशोमती ठाकूर यांच्या आरोपावर खासदार अनिल बोंडेंच प्रत्युत्तर



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती जिल्ह्यात त्रिशूलच्या नावाखाली शस्त्रास्त्र वाटपाबाबत काँग्रेस नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले की, ही शस्त्रे ग्रामीण आणि शहरी भागात मोठ्या प्रमाणात वितरित केली जात आहेत, ज्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो.

पत्रकार परिषदेत या संदर्भातील छायाचित्रे दाखवत त्यांनी विचारले की जर या शस्त्रांचा गैरवापर झाला तर त्याला कोण जबाबदार कोण असा आरोप काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी केला नंतर भाजप खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी या आरोपांना प्रत्युत्तर देत म्हटले की, त्रिशूळ स्वसंरक्षणासाठी देण्यात आला आहे, त्यात काहीही चुकीचे नाही. काँग्रेसवर निशाणा साधताना ते म्हणाले, रोहिंग्या मुस्लिमांकडे असलेली धारदार शस्त्रे आणि बंदुका काँग्रेसवाल्यांना दिसत नाहीत. सैफ अली खानवरील हल्ल्यात त्रिशूलचा वापर करण्यात आला नव्हता, तर धारदार शस्त्राचा वापर करण्यात आला होता. काँग्रेसने या वस्तुस्थितीवर आश्चर्यचकित होऊ नये. समजून घ्या. त्रिशूलच्या नावाने होणारे वितरण स्वसंरक्षणासाठी आहे आणि त्याचा गैरवापर होणार नाही.

## निवडणूक आयोगाने निपक्ष निवडणूक घ्यायला पाहिजे, विधानसभा निवडणुकीची चौकशीची मागणी करणार- गोवाल पाडवी

दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस असून मतदानाच्या न्याय हक्का साठी निवडणूक आयोगाने निपक्ष व भयमुक्त वातावरण मध्ये निवडणूक घ्यायला पाहिजे. परंतु विधानसभा निवडणुकीत तसे दिसून आले नाही यासाठी महाराष्ट्र व देशभरात प्रश्न उपस्थित करून चौकशी करण्याची मागणी करणार असल्याचे नंदुरबार लोकसभा मतदार संघाचे खासदार अॅड गोवाल पाडवी यांनी सांगितले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात २०१९ ते २०२४ दरम्यान ३२ ते ३५ लाख मतदार संख्येत वाढ झाली तर लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या ५ महिन्याच्या कालावधीत ५० लाख मतदार कसे वाढले हा संशोधनाचा विषय आहे. लोकसभा निवडणुकीत नंदुरबार विधानसभा सोडून सर्व मतदार संघात काँग्रेस ला आघाडी होती तर ५ महिन्यात एवढे चित्र बदलले कसे.लाडकी बहीण योजनेचा फायदा झाला थोडाफार झाला असावा परंतु एवढा कसा याचा अर्थ नक्की ईव्हीम मशीन मध्ये घोटाळा झाला असावा तर निवडणूक आयोगाने यांची सखोल चौकशी करावी अशी मागणी खासदार अॅड. गोवाल पाडवी यांनी केली आहे.



## बेवारस वाहने मूळ मालकांनी घेऊन जाण्याचे ठाणेदार अमरनाथ नागरे यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** तालुक्यातील डोणगांव पोलीस स्टेशनच्या आवारात मागील अनेक वर्षांपासून जमा असलेली बेवारस व क्षतीग्रस्त असलेली वाहने मूळ मालकांनी घेऊन जावी असे आवाहन ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी केले आहे.

डोणगांव पोलीस स्टेशनच्या आवारात मागील बऱ्याच वर्षांपासून बेवारस व शतीग्रस्त अनेक मोटरसायकली व चार चाकी तीन चाकी वाहने पडून आहेत. या वाहनांच्या मूळ मालकांचा शोध घेऊन मालकी हक्काबाबत कागदपत्रे तपासून ती वाहने मूळ मालकांच्या ताब्यात देण्याची कारवाई करण्यात येणार आहे. तरी ज्या नागरिकांचे वाहन हरवले, चोरीस गेले किंवा अपघात होऊन डोणगांव पोलीस स्टेशन ला जमा असल्यास नमूद असलेले चेचीस क्रमांक, इंजिन क्रमांक तपासून सदर मोटरसायकल आपल्या मालकीची असल्यास सात दिवसाच्या आत डोणगाव पोलीस स्टेशनं ला मालकी हक्काबाबत आवश्यक ते कागदपत्रे सादर करावे. ही सर्व कागदपत्रे पडताळून व तपासून सदर मोटरसायकली मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात येणार आहे. तरी पोलीस स्टेशनचे आवारात पडून असलेल्या मोटरसायकली वाहनांच्या मूळ मालकांनी येत्या सात दिवसाच्या आत आपल्या वाहनाचे मूळ कागदपत्रे डोणगाव पोलीस स्टेशनला सादर करावी अन्यथा सात दिवसानंतर या मोटरसायकल व इतर असलेल्या वाहनांचा लिलाव करण्यात येईल असे डोणगांव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे कळवले आहे.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविम्याचे २३५ कोटी लवकरच मिळणार - केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** :लाडकी बहिण योजना,बचत गट यातून महिला सक्षमीकरण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.एक रुपयात पिकविम्यामुळे सर्व शेतकऱ्यांना योजनेचा लाभ घेता आला. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ४९८ कोटी रुपयांचे पीकविमा रकमेचे वितरण झाले असून उर्वरित २३५ कोटी त्यांच्या बँक खात्यात लवकरच जमा होतील ,असे केंद्रिय आयुष,आरोग्य,कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले.

आज मेहकर तालुक्यातील कल्याणा येथे जनसंवाद दौऱ्यानिमित्त आयोजित सभेत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार संजय रायमुलकर उपस्थित होते. शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, बबनराव भोसले, सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष अरुण दळवी, दिलीपराव देशमुख, भाजपचे तालुका अध्यक्ष ऍड. शिव ठाकरे, रमेश धोंडगे, प्रमोद काळे, भागवत देशमुख ,नारायण काबरा, भास्कर निकम, शिवसेना लोणार तालुकाप्रमुख भगवानराव सुलताने, प्रल्हादराव सुलताने, युवासेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव ,तालुकाप्रमुख भूषण घोडे,राजीव काटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.





पाहुण्यांचे स्वागत सरपंच निकिता संजय सोनवणे, सुधाकर ठाकरे, केशव गारोळे, रमेश ठाकरे, समाधान रेखे, रायबा गाडे ,उद्धव डोळस, विलास मिसाळ ,अच्युत काळे, अरुण ठाकरे यांनी केले. आपल्या भाषणात ना. प्रतापराव जाधव पुढे म्हणाले की, महिलांना बस मध्ये प्रवास भाड्यात सवलत, मुलींसाठी उच्च शिक्षणाची शासनाकडून मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. युवकांसाठी नोकर भरती सुरू करण्यात आली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणावर सर्व घटकांच्या प्रगतीसाठी योजना आणण्यात आल्या. विक्रमी विकास कामे करण्यात आली. सोयाबीन ,कापूस पिकांच्या भावाबद्दल बोलताना ते म्हणाले की, राजीव गांधींच्या काळात गॅट करार करण्यात आला. तेव्हापासून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील भावाप्रमाणे शेतमालाचे हमीभाव ठरवले जातात. नाफेड मार्फत सोयाबीन खरेदीला मुदतवाढ देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

वैनगंगा नळगंगा पैनगंगा नदीजोड प्रकल्पासाठी ९० हजार कोटी खर्च येणार असून राज्य शासनाने त्यासाठी दोन हजार कोटी प्राथमिक स्वरूपात मंजूर केले आहेत. त्यातून सर्वेक्षणाचे काम सुरू आहे. येत्या आठ ते दहा वर्षात शेतीसाठी बारमाही पाणी मिळणार असून पुढील पिढ्यांना त्याचा मोठा उपयोग होणार आहे, असेही ते म्हणाले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात संजय रायमुलकर म्हणाले की मतदार संघ हा एक परिवार समजून आम्ही सातत्याने कामे करत आलो. गेल्या अडीच वर्षात चार हजार कोटींची विकास कामे मेहकर लोणार तालुक्यात मंजूर करण्यात आली. राज्य आणि केंद्रात आपले सरकार असल्यामुळे यापुढेही विकास कामे करण्यात येतील. येत्या पंचायत समिती, जिल्हा परिषद ,नगरपालिका निवडणुकांमध्ये जनतेने भरभरून मतदान करावे ,असे आवाहनही त्यांनी केले.

चौकट

दोन बैलांचे औत असते हे शेतकऱ्यांना माहिती आहे. पण मेहकर लोणार तालुक्यातील लोकांनी इथे विधानसभेला अन्य उमेदवार निवडून देऊन बैल आणि हाल्या असे औत जुंपून दिले आहे, असा टोला हाणून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, आता ५ वर्षे कुणबीक चांगली कशी करायची असा प्रश्न निर्माण झाला आहे !. राज्यात आपले भरभक्कम सरकार आहे ,केंद्रातही आहे. पण इथे लोकांनी अडचण करून ठेवली आहे. भविष्यातील निवडणुकांमध्ये तुम्ही अशी चूक करू नका ,असे आवाहन वजा विनंती ना. जाधव यांनी केली.

## शाळेची बस पलटी होऊन एका निष्पाप मुलीचा दुर्दैवी मृत्यू

### मुलांच्या शिक्षण व सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर




दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** यवतमाळ उमरखेड शहरात आज एक हृदयद्रावक घटना घडली. एका शाळेची बस पळशी फाट्याजवळ पलटी होऊन एका निष्पाप मुलीचा दुर्दैवी अंत झाला आहे. दिवटपिंप्री येथील कु. महिमा सरकाटे असे विद्यार्थीनी चे नाव असून हिच्या मृत्यूने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, पालकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

अपघातास कारणीभूत ठरलेल्या बसचा स्टीयरिंग रॉड तुटला, असे प्राथमिक तपासातून समोर आले आहे. काही ड्रायव्हर्स मद्यप्राशन करून बस चालवतात, अशी चर्चा देखील नागरिकांमध्ये सुरू आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

**सुरक्षिततेसाठी उपाययोजना आणि प्रशासनाची जबाबदारी**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळा प्रशासनाने बसची नियमित देखभाल, योग्य चालकांची निवड आणि नियमांचे काटेकोर पालन करणे गरजेचे आहे. शासनाने देखील अशा खासगी शाळांवर कडक निर्बंध घालून त्यांच्या सुविधांची तपासणी करण्यासाठी प्रभावी धोरणे राबवन्याची आवयकता आहे.

**उमरखेड तालुक्यात आज शनिवारी सकाळी झालेल्या स्कूल बस अपघात प्रकरणी पालकमंत्री संजयभाऊ राठोड यांनी तत्काळ दखल घेवून जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना घटनास्थळी तातडीने मदत पोहचविण्याचे निर्देश दिले. तसेच या अपघतासाठी दोषी असणाऱ्या विरुध्द गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. जिल्ह्यातील सर्वच शाळांच्या स्कूल बसची तपासणी करण्याचे निर्देशही पालकमंत्री संजयभाऊ राठोड यांनी दिले. या घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त करून मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबाप्रती संवेदना व्यक्त केल्या व अपघातग्रस्त कुटुंबांना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश दिले.**

### इंग्लिश मीडियम शाळांची हवा आणि पालकांची विवशता

आजच्या काळात इंग्लिश मीडियम शाळांचे महत्त्व आणि आकर्षण प्रत्येक पालकाला मोहवते. आपल्या मुलांचे उज्वल भविष्य घडावे, त्यांना उत्तम शिक्षण मिळावे म्हणून पालक हजारोंची फी भरून या शाळांमध्ये मुलांना पाठवतात. मात्र, या शाळांची कार्यक्षमता, वाहनांची देखभाल आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नांकडे पालक कधीही गांभीर्याने पाहत नाहीत.

## भंडारा आयुध निर्माणीतील स्फोट,संतप्त कामगार, कुटुंबियांकडून अधिकाऱ्यांना घेराव आणि मारहाण

**भंडारा/प्रतिनिधी :** भंडाऱ्यातील जवाहरनगरच्या आयुध निर्माणी कारखान्यात शुक्रवारी स्फोट झाल्याने ८ कामगार मृत्यूमुखी पडले. या घटनेमुळे कामगारांमध्ये रोष असून त्यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांना घेराव करीत मारहाण केली. यामुळे येथील वातावरण तापले आहे. कंपनी व्यवस्थापनाच्या दुर्लक्षित पणामुळे तसेच अधिकाऱ्यांच्या मनमानीमुळे कोवळी तरूण मुले आणि कामगार यात दगावल्यने त्यांचे कुटुंबीय संतापले असून त्यांनी या घटनेचा जाब विचारण्यासाठी कंपनीच्या अधिकाऱ्यांना घेराव घालत मारहाण केली. त्यामुळे वातावरण चिघळले आहे. आज कारखाना बंद ठेवण्यात आला आहे.

दरम्यान कंपनीतील एका शिकाऊ विद्यार्थ्याने सांगितले की, मागील अनेक वर्षापासून हा प्रकार सुरू आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांना वारंवार याबाबत निवेदन देऊन प्रशिक्षणार्थीना अशा विभागात काम ासाठी पाठवू नये असे सांगण्यात आले. मात्र अधिकाऱ्यांकडून या प्रशिक्षणार्थीना कायम दबावात ठेवण्यात येत होते. कुणी विरोध केला तर ' काम करायचे असेल तर करा नाही तर नोकरी सोडून द्या ' असे उर्मटपणे सांगितले जायचे. त्यामुळे नाईलाजास्तव या प्रशिक्षणार्थीना येथे काम करावे लागत होते.

२० वर्षीय अंकित बारई या प्रशिक्षणार्थीचा नाहक बळी गेल्यानंतर इतर कर्मचाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. अनेक कर्मचारी, प्रशिक्षणार्थी यांनी रात्री उशिरा साहुली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. वरीष्ठ अधिकारी यांच्यावर कारवाईची मागणी केली असून आज सकाळ पासून परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## संविधान उद्देशिका बॅनर चे वितरण

### एमपीजे च्या संविधान सर्वांसाठी अभियाना अंतर्गत उपक्रम




दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :**२६ जानेवारी रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारल्याच्या स्मरणार्थ आणि त्याच्या मूलभूत मूल्यांबद्दल लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी मुव्हमेन्ट फॉर पीस अँन्ड जस्टीस फॉर वेलफेअर (एमपीजे ) राज्यव्यापी सर्वांसाठी संविधानअभियान राबविण्यात आले.

या अभियाना अंतर्गत उपविभागीय अधिकारी कार्यालय, पोलीस उपविभागीय कार्यालय, नगर परिषद मुख्याधिकारी कार्यालय, आगार व्यवस्थापक कार्यालय, पोलीस स्टेशन , गटाशीक्षण अधिकारी कार्यालय, कृषी महाविद्यालय , गो .सि गावंडे प्राचार्य कार्यालय, इंदीरा गांधी महाविद्यालय, मुख्याध्यापक जिल्हा परिषद मुलांची शाळा कार्यालय, सार्वजनिक बांधकाम कार्यालय आदी शासकीय कार्यालय, महाविद्यालय तसेच शाळां मध्ये संविधान उद्देशिकेचे बॅनर वितरीत करण्यात आले.

या प्रसंगी संघटनेचे जिल्हाध्यक्ष फेरोज अन्सारी, सुनिल चिंचोलकर, उत्तम बरवड, देवानंद मोरे, रेखाताई गायकवाड, स्वरांजली वाघमारे ,रसुल पटेल, प्रा गजानन दामोदर, मोहसीन राज, सैय्यद रजा, डॉ फारुक अबरार, समीर अहेमद, सिध्देश्वर दिवेकर, संजय मोरे, राहुल सुर्य. साहेबराव कदम, वैशाली कवडे, मिनाज अहेमद, तस्लीम अहेमद, अन्सार हुसैनी ,मोनिका भगत आदी संघटनेच्या कार्यकर्ता सह विविध सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते .

# पालकमंत्र्यांनी घेतला जिल्ह्याचा आढावा; तब्बल तीन तास घेतली अधिकाऱ्यांची बैठक

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री ना.मकरंद पाटील हे जिल्ह्यात दाखल झाले असून त्यांनी शनिवारी जिल्ह्यातील विकासकामे, योजना, प्रकल्पांसह संपूर्ण जिल्ह्याचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात झालेल्या या प्रशासकीय विभागांच्या आढावा बैठकीला आमदार संजय गायकवाड, आमदार सिद्धार्थ खरात, आमदार मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अपर जिल्हाधिकारी सदाशीव शेलार यांचेसह उपविभागीय अधिकारी, विविध विभागांचे प्रमुख उपस्थित आहेत.




पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी या बैठकीत जिल्ह्यातील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थितीसह कृषी, शिक्षण, आरोग्य, उद्योग, सिंचन प्रकल्प, पर्यटन, रस्ते व रेल्वे प्रकल्प, वैद्यकीय व आयुर्वेद महाविद्यालय, सिंदखेड राजा व लोणार विकास आराखडा, वने, नगरविकास, एसटी बस व डेपो, ई-नाम सुविधा, शेततळे, घरकूल, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र, कौशल्य विकास व रोजगार, प्रधानमंत्री पीक विमा योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प, प्रधानमंत्री सुर्यघर योजना, आवास योजना, जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मनरेगा यासह विविध विषयांचा आढावा घेतला.

या बैठकीच्या सुरुवातीला पालकमंत्र्यांनी सर्व प्रशासकीय विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांचा परिचय करुन घेतला. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्ह्यातील विविध विकास कामे, प्रकल्प, योजना, उपक्रमांच्या सद्यस्थितीची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.